नियमीत दिवाणी दावा क्रमांक १८८/२०१६

निशाणी १८ वरील आदेश

१. प्रस्तुतचा दावा कायम मनाईसाठीचा असून वादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्यात दुरुस्ती करणेसाठी केलेला आहे.

२. वादीचे कथनानुसार दाव्यामध्ये प्रतिवादी नंबर १० हिचे नांव 'रत्नाबाई' ऐवजी ' काशीबाई' असे टायपिंग दोषामुळे व नजरचुकीने लिहीले गेले आहे. त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. प्रस्तुतची दुरुस्ती औपचारी स्वरुपाची असुन त्यामुळे मूळ रचनेत अगर स्वरुपात कोणताही बदल होत नाही. त्यामुळे तिने दाव्यात दुरुस्ती करणेस परवानगी मिळणे विषयी विनंती केली आहे.

३. प्रतिवादींनी निशाणी १९ कडे म्हणणे देवून अर्जास विरोध केला आहे. त्यांनी अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

४. उभय पक्षकारांतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने मागीतलेली दुरुस्ती ही औपचारीक स्वरुपाची असून त्यामुळे दावेच्या रचनेत कोणताही बदल होणार नाही. प्रतिवादींनी त्यांचे म्हणणेमध्ये प्रतिवादी नंबर १० चे नांव रत्नाबाई असल्याचे मान्य केले आहे. तसेच निशाणी ९ कडील समन्स सोबत जोडलेले प्रतिवादी नं. १० चे ओळखपत्राचे अवलोकन करता त्यामध्ये तिचे नांव रत्नाबाई असे नमूद आहे. सबब प्रस्तुतची दुरुस्तीस मंजूरी देणे योग्य वाटते.

८. वरील सर्व परिस्थितींचा व कारणांचा विचार करुन खालील प्रमाणे आदेश

करणेत येत आहे –

अ. अर्ज मंजूर करणेत येतो.

ब. वादीने मुदतीत दुरुस्ती करणेची आहे.

सही/–

दिनांकः २३/०८/२०१७ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कुरुंदवाड